# लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा

लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा दिनांक १४ माहे नोव्हेंबर २०२२

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. तर्फे
मा. प्रज्ञा पोतदार / पवार
सह व्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
शंकर शेठ रोड,स्वारगेट पुणे—४११०३७

लिहून घेणार

यांसी

**गंगा संजय धेंडे**

माता रमाबाई आंबेडकर शाळेजवळ,
१५५.सी, पत्रा शेड अजंठा नगर,
चिंचवड पुणे ४११०१९
**आधार कार्ड : २०८२९९८८८९९६**
**पॅन कार्ड नं : BLCPD3637DF**

लिहून देणार

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR HAVELI-1 / सह दुय्यम निबंधक हवेली-१

हवेली-१
२३५७ | ५ | १६
२०२२

सदर करारनामा हा आजदिनांक १४/११/२०२२ रोजी पुणे येथे करण्यात येत आहे.

पुणे महानगरपरिवहन महामंडळाच्या **पिंपरी** येथिल सेवकांकरीता कॅन्टिन सुविधा उपलब्ध करून देणे फॅक्टरी ॲक्टनुसार आवश्यक असल्याने कॅन्टिन चालविण्यासाठी कॅन्टिनचीजागा लिव्ह ॲण्ड लायसन्स पद्धतीने देणेबाबत निविदा प्रक्रिया करण्यात आली असून त्यामध्ये जास्तीत जास्त निविदा रक्कम रूपये **१७,३००/-** प्राप्त झाली आहे. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेस अनुसरून पिंपरी येथिल कॅन्टिनसाठी जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स पद्धतीने २००चौ.फूट क्षेत्राची जागा ३+२ एकूण ५ वर्षाचे कालावधीसाठी खाद्यपदार्थाची विक्री करण्यास व कॅन्टिनच्या जागेची लायसन्स फी म्हणून दरमहाचे भाडे रक्कम रूपये २,५५० /—अधिक १८ टक्के जीएटी असे एकूण ३००९/—इतके होत असून सदरचे भाडे ५ वर्षे कालावधीसाठी लिहून देणार यांनी मान्य, कबूल व स्विकृत केलेले आहे. तसेचे मान्य निविदेतील अटी व शर्ती यांना अधिनराहून खालिल प्रमाणे जाहिर करीत आहे व स्वखूषीने लिहून देत आहे.

